**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८०/२०१९** **दिनांक ०४/१०/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २८/०९/२०१९ ते ०४/१०/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०५/१०/२०१९ सकाळी ८:३० पासून ०९/१०/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२८/०९** | **२९/०९** | **३०/०९** | **०१/१०** | **०२/१०** | **०३/१०** | **०४/१०** | | **०५/१०** | **०६/१०** | **०७/१०** | **०८/१०** | **०९/१०** |
| ४.२ | ०.० | २२.२ | ७.६ | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ० | ० | १६ | १५ | १३ |
| २९.० | ३१.० | ३२.४ | ३०.६ | ३१.० | ३१.० | ३२.४ | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३२ | ३३ | ३४ | ३४ |
| २४.८ | २७.४ | २६.४ | २६.० | २६.० | २६.० | २६.४ | **किमान तापमान (अं.से)** | २४ | २५ | २५ | २६ | २६ |
| १ | १ | २ | ० | ० | ० | ० | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ४ | ४ | ६ | ६ | ८ |
| ९५ | ८५ | ९२ | ९२ | ९२ | ८४ | ८० | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ८३ | ८३ | ८० | ७८ | ७६ |
| ७४ | ७२ | ८३ | ७७ | ७७ | ६९ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ६८ | ६६ | ६६ | ६३ | ६१ |
| ४.६ | ५.३ | ४.१ | ३.० | २.४ | १.९ | २.० | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ११.३ | ११.४ | १२.५ | ११.१ | ८.३ |
| वा.उ. | वा.उ. | उ. | वा.उ. | प. | आ.पू. | आ.पू. | **वाऱ्याची दिशा** | इ.उ. | उ. | उ. | नै.द. | इ.पु. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| **३४.०** | **४१५६.४** | **२३५९.६** |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ७ ते ९ ऑक्टोबर,२०१९ पर्यंत मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून कमाल तापमानात वाढ संभवते तसेच आकाश मेघाच्छादित राहील.**

**दिनांक ४ ते १० ऑक्टोबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्य राहील.**

**सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार पालघर जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा आणि प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **फुलोरा ते दाणे भरणे अवस्था** | • निमगरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत व गरवे भात फुलोरा अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी.<br>• हळवे भात पक्व होवू लागल्यास कापणी पूर्वी ८-१० दिवस भात खाचरातील पाणी बाहेर काढून टाकावे.<br>• दिनांक ७,८ व ९ ऑक्टोबर रोजी पाऊसाची शक्यता असल्याने पाऊसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या हळव्या भात पिकाची सकाळच्या वेळेस "वैभव" विळ्याच्या सहाय्याने जमिनीलगत कापणी करून लगेच मळणी करून साठवणी अगोदर २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे.<br>• वाढते ऊन व आर्द्रतेचे प्रमाण यामुळे वरकस आणि उतार असलेल्या जमिनीतील हळव्या जातीच्या भात पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यामुळे पाऊसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या हळव्या भात पिकाची कापणी उरकून घ्यावी. |
| **आंबा** | **पालवी** | • जास्त हवामान आर्द्रतेच्या काळात जास्त पालवी असलेल्या झाडांवर बुरशीची वाढ झालेली असते. सद्यस्थितीतील वाढणाऱ्या तापमानामुळे सदर बुरशीची वाढ जोमाने होऊन फांदी मर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी रोगग्रस्त पाने गोळा करून नष्ट करावीत, रोगट फांद्या कापून काढाव्यात कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट लावावीत. अशा प्रकारे बागेची स्वच्छता केल्यावर मेटॅलक्झील ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के या संयुक्त बुरशीनाशकाची २० ग्रॅमप्रती १० लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण झाडावर पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी.<br>• वाढत्या तापमानामुळे आंब्याच्या नवीन येणाऱ्या पालवीवर तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासूनसंरक्षण करण्यासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **काजू** | **पालवी** | • जास्त हवामान आर्द्रतेच्या काळात जास्त पालवी असलेल्या झाडांवर बुरशीची वाढ झालेली असल्याने तसेच सद्यस्थितीतील वाढणाऱ्या तापमानामुळे सदर बुरशीची वाढ जोमाने होऊन फांदी मर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी रोगग्रस्त पाने गोळा करून नष्ट करावीत, रोगट फांद्या कापून काढाव्यात कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट लावावीत. अशा प्रकारे बागेची स्वच्छता केल्यावर मेटॅलक्झील ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के या संयुक्त बुरशीनाशकाची २० ग्रॅमप्रती १० लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण झाडावर पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी.<br>• वाढत्या तापमानामुळे काजूच्या नवीन येणाऱ्या पालवीवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी नवीन पालवी फुटण्याच्या वेळी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **नारळ** | **फळधारणा** | • नारळावरील इरीओफाईड कोळीच्या प्रादुर्भावामुळे फळाच्या देठाखालच्या भागात पांढरट, पिवळे, त्रिकोणी चट्टे दिसून येतात व नंतर चट्टे वाढत जाऊन त्रिकोणी आकाराचे होतात. प्रादुर्भित भागावरील फळांचे आवरण तडकते परिणामी नारळ लहान राहतात तसेच लहान फळांची गळ होते. किडीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के कडूनिंबयुक्त (अझाडीराक्टीन) कीटकनाशक ७.५ मि.ली. |

| | | |
|---|---|---|
| | | समप्रमाणात पाण्यात मिसळून मुळाद्वारे ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात द्यावे. औषध दिल्यानंतर ४५ दिवसापर्यंत नारळ काढू नयेत. याशिवाय नारळावर १ टक्का कडुनिंबयुक्त कीटकनाशक (निमाझोल) ४ मि. ली. प्रतीलिटर पाण्यातून नारळाच्या घडावर पडेल अशी फवारणी करावी. फवारणी करण्यापूर्वी सर्व किडग्रस्त व तयार नारळ काढून घ्यावेत. पडलेले फळे, फुलोरा गोळा करून नष्ट करावेत. |
| **चिकू** | **फळधारणा** | • पाऊसाची उघडीप पाहून चिकूबागांची गवत काढून साफसफाई करावी. वाळलेल्या, मृत आणि अशक्त फांद्या कापून विरळणी करावी व कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट लावावी तसेच १ टक्के बोर्डोमिश्रणाची संपूर्ण झाडावर फवारणी करावी.तसेच बी पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी बागेची स्वच्छता करून प्रोफेनोफोस५० टक्के प्रवाही १५ मि. ली. किंवा इंडोक्झाकार्ब १४.५ टक्के प्रवाही ५ मि.ली किंवानोव्हल्युरोन १० टक्के प्रवाही ५ मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही १० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यातून पहिली फवारणी पाऊसाची उघडीप असताना करावी व पुढील दोन फवारण्या एका महिन्याच्या अंतराने कीटकनाशके आलटून पालटून कराव्यात. फवारणी पूर्वी तयार फळांची काढणी करावी. |
| **भाजीपाला रोपवाटिका** | **पेरणी** | • रब्बी हंगामासाठी रोपे तयार करण्याकरिता वाफसा स्थितीत जमिनीची मशागत करून ३ मी. लांब X १ मी. रुंद X १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून भाजीपाला बियाण्यांची पेरणी करावी. रोपांची मर रोगापासून संरक्षण करण्याकरीता पेरणीपूर्वी ३ ते ४ दिवस वाफ्यावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची भिजवण करावी तसेच थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | -- | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठ्यामध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोलीयेथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**